सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.०२०-२६१२३३७१ E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, चे कलम ३०, ३३, ३४, ४१ व कलम ५१

२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसुचना क्र. कोरोना २०२०/प्र.क्र. ५८ आरोग्य ५ दि. १३ मार्च २०२०

३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसुचना क्र. प्र.क्र. ५८ आरोग्य ५ दि. १४ मार्च २०२०

४) मा. मुख्य सचिव महाराष्ट राज्य यांचेकडील आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर/९२ /डीएम-१ दि. २३ मार्च २०२०

५) मा. मुख्य सचिव महाराष्ट राज्य यांचेकडील आदेश क्र. DMI/२०२०/सीआर/९२ /DISM-१ दि. १५ मार्च २०२०

६) जिल्हाधिकारी पुणे यांचेकडील आदेश क्र. जि.आ.व्य/कोरोना विषाणू/२४९/२०२० दि. ३१/०३/२०२०

---

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.जि.आ.व्य/कावि/ ५७५ /२०२०.
पुणे, दिनांक :- १८ /०४/२०२०.

**आदेश**

ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

राज्य शासनाने संदर्भ क्र २ अन्वये कोरोना विषाणू (कोव्हीड -१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधक कायदा दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीची अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भ क्र. ३ अन्वये प्रसिध्द केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे. त्याबाबतची नियामावली संदर्भ क्र. २ अन्वये प्रसिध्द केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केले आहे.

या अनुषंगाने वाचा क्र. १, २, ३, ४ व ५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांचेमार्फत कोरोना विषाणू साथ संसर्ग अनुषंगाने विविध आदेश पारीत करणेत आले होते तथापि लॉगडाऊन बाबत राज्यात सुधारीत घोषणा झाल्याने **मी नवल किशोर राम जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे** मला प्राप्त अधिकारानुसार पुणे जिल्हयामध्ये यापूर्वी या कार्यालयामार्फत कोरोना विषाणू साथ संसर्ग उपाययोजनेच्या अनुषंगाने पारीत करणेत आलेले सर्व आदेश हे या कार्यालयाचे पुढील आदेशापर्यत लागू राहतील असे आदेश पारीत करीत आहे. तसेच यापुढे वेळोवळी शासन देईल त्या निर्देशाप्रमाणे आदेश निर्गमित करणेत येतील.

उपरोक्त आदेशाचे व्यक्तीनी / नागरीकांनी उल्लंघन केल्यास त्यांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानन्यात येईल आणि पुढील कार्यवाही करणेत येईल.

जिल्हाधिकारी पुणे

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,पुणे**

**प्रति, - १) सर्व विभाग प्रमुख ------------------जिल्हा पुणे आवश्यक कार्यवाही साठी**
**२) जिल्हा माहिती अधिकारी, पुणे----------- आवश्यक कार्यवाही साठी**

प्रत:-

**१) मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर**
**२) मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर**